# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ६३ वा ❑ शनिवार दि.१२ एप्रिल २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## बिअर उद्योगाची सरकारला चिंता बंद होणाऱ्या मराठी शाळांची नाही

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

राज्यात बिअर पिणाऱ्यांची संख्या अचानकपणे कमी झाली. उत्पादन शुल्क वाढविल्याने बिअरच्या किमती वाढल्या. आता त्यामुळे शासनाच्या महसुलात मोठी घट झाली. त्यामुळे सरकारची चिंता वाढली. बिअरचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांनाही बराच फटका बसू लागला आहे. कंपन्यांच्या शिष्टमंडळाने सरकारच्या प्रतिनिधींची भेट घेत आपल्या अडचणी सांगितल्या. मग काय सरकारने थेट पाच आयएएस दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या अभ्यास समितीचे गठण केले. बिअर उद्योगाच्या माध्यमातून महसुलात वाढ होण्यासाठी शिफारस सादर करण्यासाठी अभ्यास गट स्थापन करण्याबाबत आदेश निर्गमित केला. शाळेतील विद्यार्थी संख्या कमी होत आहे.याविषयी मात्र सरकारला कोणतीही चिंता नाही. पटसंख्या कमी होत आहे म्हणून उलट मराठी शाळा बंद करण्यात येत आहेत.शाळांची पटसंख्या कमी होत आहे., यासाठी समिती नेमणार का? हा प्रश्न या अनुषंगाने निर्माण होत आहे.यासाठी शासनाने कारणे शोधण्यासाठी आज पर्यंत कोणतीही समिती नेमली नाही. शाळांमधील ''पटसंख्या'' कमी होत आहे म्हणून उलट ''मराठी शाळा बंद'' करण्यात येत आहेत. त्या बंद होण्याचे सर्वसामान्य व गोरगरीब वर्गावर काय परिणाम होतील यासाठी कोणताही अभ्यास गट नेमण्याची शासनात बसलेल्या अधिकारी व लोकप्रतिनिधींना काहीच गरज वाटली नाही ही ''अत्यंत लाजिरवाणी'' बाब आहे.

प्रति वर्षी मराठी शाळांची विद्यार्थी संख्या कमी होत आहे. शासन मात्र याबाबत अनभिज्ञ पणाचे सोंग घेत आहे.राज्यात मराठी शाळांचीच संख्या भविष्यात मोठ्या प्रमाणावर कमी होण्याची किंवा त्या बंद होण्याची भीती निर्माण झालीय. राज्य सरकारच्या स्वयंअर्थ सहाय्यित शाळा अधिनियमांतर्गत १२७ नव्या खासगी शाळांचे प्रस्ताव पात्र ठरवण्यात आले आहेत. त्यात १०६ शाळा इंग्रजी माध्यमाच्या असून संपूर्णपणे मराठी माध्यमाच्या केवळ १५ शाळा आहेत. याशिवाय ४ शाळा या मराठी आणि इंग्रजी अशा संयुक्त माध्यमाच्या आहेत. या शाळांची यादी शालेय शिक्षण विभागाने सार्वजनिक केली असून त्यावर हरकती मागवण्यासाठी ५ मार्चपर्यंत मुदत देण्यात आली होती.

मराठी भाषेला गेल्यावर्षी अभिजात भाषेचा दर्जा मिळाला होता. माय मराठी वाचवण्यासाठी हे पाऊल फार महत्त्वाचं ठरणार आहे. मात्र, मराठी भाषेबाबत तळागाळातून प्रतिसाद मिळणं आवश्यक आहे. त्यासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न करण्याची गरज आहे. शालेय शिक्षणात मराठीचा समावेश हा मराठी भाषा वाढीसाठी अतिशय महत्त्वाचा आहे. मात्र, मराठी शाळांची संख्या कमी होत असल्याचं चित्र आहे. या बद्दल शासना कडून प्रयत्न करण्याची गरज आहे.नुकतीच मुंबई महापालिकेनं केंद्र सरकारशी संलग्नित ''युडीआयएसई'' या यंत्रणेकडं महापालिकेच्या शाळांची माहिती दिली होती. त्यानुसार मराठी शाळांची संख्या १०० ने घटल्याचं आढळलं आहे. २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात महानगरपालिकेच्या ३६८ मराठी माध्यमाच्या शाळा होत्या. त्यांची संख्या २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात घटून २६२ वर आली आहे. तर आता राज्यभरात नव्या शाळांच्या प्रस्तावात केवळ १५ शाळाच मराठी आहेत. इंग्रजी-मराठी संयुक्त माध्यमाच्या ४ शाळा मिळून हा आकडा १९वर जातो. हे प्रमाण जेमतेम १० टक्क्यांच्या आसपास आहे. यापैकी दोन शाळांचे प्रस्ताव मुंबईत आहेत तर, सर्वाधिक प्रत्येकी ४ शाळांचे प्रस्ताव कोल्हापूर, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगरात आहे. मराठी शाळा बंद पडल्या आहेत किंवा पडत आहेत, त्याला पालक आणि सरकार जबाबदार आहे. मराठीत पाल्य शिकला तर त्याच्या पोटापाण्याची योग्य सोय होणार नाही, असं पालकांना वाटतं. इंग्रजी ज्ञानभाषा असू शकते, मात्र मराठीत शिकलो तर जगात मागे राहील, हा समज पूर्णतः चुकीचा आहे. एकीकडं, राज्य सरकारनं सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करुन कमी पटसंख्येच्या शाळा बंद करणार नाही, अशी भूमिका घेतली आहे. मात्र, संच मान्यतेच्या निकषांमुळं शाळांना शिक्षक मिळणार नसल्यानं अप्रत्यक्षरित्या शाळा बंद पडण्याची भीती आहे. सध्या १०० पैकी ८० विद्यार्थी सीबीएसई आणि आयसीएसई मध्ये जातात, तिथे मराठी भाषेला दुसरी भाषा म्हणून शिकवले जाते. महाराष्ट्रात सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी विद्यार्थ्यांना पहिली भाषा म्हणून मराठी भाषा शिकवण्याची सक्ती करण्याची गरज आहे. संस्थाचालक, पालक आणि सरकारनं याकडं लक्ष देण्याची गरज आहे. मराठी शाळा चालकांनी विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमांच्या शाळांप्रमाणे सोयी सुविधा पुरवण्याकडं देखील लक्ष देण्याची गरज आहे. मद्य धोरणापेक्षा मराठी शाळांचा प्रश्न तितकाच महत्त्वाचा आहे.या शाळा बंद पडत असताना सरकार व शिक्षण विभागाकडून सकारात्मक प्रयत्न व्हायला पाहिजे..या शाळांमध्ये शिकणारे विद्यार्थी गोरगरिबांचे व वंचित समुदायाचे विद्यार्थी आहेत. आधीच या समूहातील मुलं शिक्षण घेण्यापासून वंचित असतात. सरकारी शाळा बंद पडत असताना या मुलानी शिक्षण कुठे घ्यायचे? इंग्रजी माध्यमांच्या शाळांची फी भरमसाठ असल्यामुळे गोरगरिबांची मुलं भरमसाठ फी भरू शकत नाही. या मुलांना शिक्षण मिळायला पाहिजे.एकाकीकडे मराठी सक्तीचा आदेश काढायचा तर दुसरीकडे मराठी माध्यमाच्या शाळा बंद करायच्या,असे दुटप्पी धोरण सरकारचे आहे. बिअर पिणाऱ्यांविषयी सरकार महसूलासाठी आपुलकी दाखवित आहे.तशीच आपुलकी व कळवळा मराठी शाळांबाबत दाखवायला पाहिजे..मात्र सरकार याबाबत उदासीन आहे सरकारचे धोरण सावकाराच्या भूमिके सारखे, कारखानदारा सारखे आहे.मराठी सरकारी शाळा वाचवून सरकारच्या हाती काय लागणार? उलट शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पगारावर कोट्यावधी रुपये खर्च होत आहे,अशी भूमिका सरकारची आहे..म्हणून सरकारने मराठी माध्यमांच्या शाळा बंद करण्याचा सपाटा सुरू केलेला आहे.

# संकटमोचन हनुमान

**ज्योतिर्मय साहित्य**

हनुमान जयंती म्हणजे हिंदू देवता हनुमान यांचा जन्मदिवस होय. चैत्र महिन्यातील पौर्णिमा तिथीच्या दिवशी सूर्योदयाच्या वेळी हनुमान जयंती, जन्मोत्सव साजरा केला जातो. या दिवशी हनुमानाच्या देवळात सूर्योदयाच्या आधीपासून किर्तनाला प्रारंभ करतात. सूर्योदयाला हनुमानाचा जन्म होतो अशी कथा आहे, त्यानुसार किर्तन संपते आणि सर्वांना प्रसाद वाटला जातो.

महाराष्ट्रात शनिवार, तर इतर भारतात शनिवार आणि मंगळवार हे मारुतीचे वार मानले जातात. या दिवशी मारुतीला शेंदूर, तेल तसेच रुईची फुले आणि पाने अर्पण करण्याची प्रथा आहे. मारुतीला नारळ फोडण्याची रुढीही पूर्वापार चालत आलेली आहे.

हनुमान हा सप्त चिरंजीवांपैकी एक चिरंजीव आहे, म्हणजे तो अजूनही जिवंत आहे, अशी मान्यता आहे. जगात ज्या ज्या ठिकाणी, जेव्हा जेव्हा रामाचे नाव घेतले जाते, तेथे मारुती हजर असतो, असे म्हणतात. या माहितीच्या आधाराने कवी तुलसीदासाने मारुतीला शोधून काढले. मारुतीचा उल्लेख महाभारतातदेखील येतो. तो महाभारताच्या युद्धात दरम्यान अर्जुनाच्या रथाच्या ध्वजावर विराजमान होता. झोपलेल्या मारूतीच्या मूर्ती काही ठिकाणी आहेत.

भारतात अशा आठ मूर्ती आहेत : १. भद्रा मारुती (खुलताबाद येथील घृष्णेश्वराच्या जवळ). २, अलाहाबादेत यमुनेच्या तीरावर (संगम घाटावर) ३, मध्य प्रदेशात जाम सावली येथे ४. राजस्थानमध्ये अलवर येथे ५. राजकोट ६. इटावा जिल्ह्यात पिलुआ गावात ७. चांदोली जिल्ह्यात आणि ८. छिंदवाडा येथे. तसेच बुलढाणा जिल्ह्यात खामगाव जवळ नांदुरा येथे ११० फूट उंच हनुमंताची आकर्षक मूर्ती आहे.

मारुती स्तोत्र हे मारुती तथा हनुमान या हिंदू देवतेची स्तुती करणारे काव्य होय.

या स्तोत्राची अनेक रुपे आहेत. त्यांपैकी समर्थ रामदासांनी लिहिलेले स्तोत्र महाराष्ट्रात प्रचलित आहे. याची सुरुवात भीमरूपी महारुद्र वज्र हनुमान मारुती... या पंक्तीने होते.

: हनुमान चालीसा हे हिंदी भाषिक राज्यात लोकप्रिय असलेले, हनुमानाचे एक स्तोत्र आहे. या स्तोत्रात ४० कडवी आहेत

श्री गोस्वामी तुलसीदास यांनी श्री हनुमान चालीसाची रचना १६ व्या शतकात केली.

हे स्तोत्र दोहा आणि चौपाई स्वरूपातील ४० श्लोकांचे आहे, म्हणून तिला चालीसा असे म्हणतात.

समर्थ रामदास स्वामी यांनी महाराष्ट्रातील चाफळ आणि जवळच्या परिसरात सातारा, कराड, कोल्हापूर मध्ये ११ ठिकाणी मारुतीच्या मूर्त्यांना स्थापित केले. आपण या ठिकाणांची माहिती करून घेऊया

**१) चाफळचा वीर मारुती / प्रताप मारुती /भीममारुती**

सातारा कराड चिपळूणकडून जाणाऱ्या फाट्याजवळ उंब्रज गावाजवळ चाफळ येथे रामाच्या देऊळासामोरी हात जोडून उभा दास मारुती आणि त्याच देऊळाच्या मागे प्रताप मारुतीची कृष्ण नदीच्या काठावर चुना, वाळू, ताग पासून बनवलेलीही मूर्ती स्थापिली आहे. ६ फुटी ही उंच मूर्ती रामाच्या समोर हात जोडून उभारल्या या मूर्तीचे नैत्र श्रीरामाच्या चरणाकडे स्थिर असल्याचे जाणवते. चाफळच्या रामाच्या देऊळाच्या मागे रामदासांनी बांधलेले हे देऊळ आजतायगत आहे. या देऊळातली मारुतीची मूर्ती भीमरूपी स्तोत्रामध्ये वर्णन केल्या सारखीच आहे. कमरेला सोन्याची कासोटी, किणकिणत घंटा, नेटका, सडपातळ डोळ्यातून अग्निवर्षाव होताना जाणवणे. मूर्तीच्या पायाखाली दैत्य आहे. चाफळ येथे मारुतीच्या दोन मुर्त्यांची स्थापना रामदासांनी केली असून दोन्ही मूर्तींचे रूप वेगवेगळे आहे.

**२) माजगावचा मारुती**

चाफळपासून ३ कि.मी. लांब एक गावात पाषाणाच्या रूपात असलेल्या दगडाला समर्थानी मारुतीचे रूप दिले. ५ फुटीची मूर्ती चाफळच्या राम मंदिराकडे तोंड करून उभारलेली आहे. आधीच्या कौलारू, माती विटाच्या देऊळाला जीर्णोद्धार करून नवे रूप देण्यात आले आहे.

**३) शिंगणवाडीचा मारुती / खडीचा मारुती / बालमारुती**



याला चाफळचा तिसरा मारुती देखील म्हणतात. शिंगणवाडीची टेकडी चाफळ पासून १ की.मी. च्या अंतरावर आहे. येथे रामघळ समर्थांच्या ध्यानाचे छोटेशे स्थळ आहे. येथे समर्थानी मारुतीची छोटीशी सुबक मूर्तीची स्थापना केली. ४ फुटी उंचीची उत्तरेकडे तोंड केलेली ही मूर्ती जिच्या डाव्या हातात ध्वजासारखी वस्तू दिसण्यात येते. सर्व ११ मारुतीच्या देऊळात हे सर्वात लहान देऊळ आहे.

आजूबाजूच्या परिसरात घनदाट झाडे आहे. या देऊळाचा कळस तांबड्या रंगाने रंगविला आहे.

**४) उंब्रजचा मारुती / मठातील मारुती**

चाफळचे २ आणि माजगावातील मारुतीचे दर्शन करून परत उंब्रजला आल्यावर इथे जवळच ३ मारुती आहे. त्यातील हा एक उंब्रजचा मठातील मारुती. असंही आख्यायिका आहे की समर्थ चाफळवरून उंब्रजला दररोज स्नानेसाठी येत असत. तेव्हा एकदा ते नदीत बुडताना त्यांना स्वयं हनुमंतानेच वाचविले होते. समर्थांना उंब्रज मधील काही जमीन बक्षीस म्हणून मिळाली होती. तिथे समर्थानी मारुतीच्या देऊळची स्थापना करून चुना, वाळू आणि तागने निर्मित ही मारुतीची देखणी मूर्ती आहे. ह्या मूर्तीच्या पायाखाली दैत्य दिसतो.

**५) मसूरचा मारुती**

उंब्रजपासून १० की.मी. असलेले मसूर येथे मारुतीची स्थापना केली आहे. ५ फुटीची चुन्यापासून बनवलेलीही पूर्वाभिमुखी असलेली मारुतीची मूर्ती अतिशय सौम्य प्रसन्न असलेली मूर्तीच्या मस्तकी मुकुट, गळ्यात माळ, जानवं, कमरेला मेखला, पायाखाली जंबुमाळी नावाचा राक्षस दिसतो. सहा दगडी खांब्यावर देऊळाचे छत तोलून धरले आहे. मूर्तीच्या एका बाजूस शिवराम आणि दुसऱ्या बाजूस समर्थांचे चित्र काढलेले आहे. या देऊळाचा सभामंडप १३ फूट लांबी रुंदीचा आहे.



**हनुमान जन्मोत्सव विशेष**


दिलीप देशपांडे.
जामनेर. जि.जळगांव.
मोबा.८९९९५६६९१७


**६) शिराळ्याचा मारुती**

सांगली जिल्ह्यात नागांसाठी प्रसिद्ध असलेले हे गाव शिराळे याचा एसटी स्टॅन्डजवळ हे मारुतीचे देऊळ समर्थानी स्थापित केले आहे. हे देऊळ देखणे असून मारुतीची मूर्ती अतिशय भव्य आहे. ७ फुटी उंच ही मूर्ती चुन्याने बनवलेली आहे. ही मूर्ती उत्तराभिमुखी आहे. कटिवस्त्र आणि त्यातील गोंडा सुंदर असून कंबरपट्ट्यामध्ये घंटा बसविण्यात आला आहे. मूर्तीच्या डोक्याचा उजवी आणि डाव्या बाजूस झरोके आहे ज्यामधून सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळी मूर्तीच्या तोंडावर प्रकाश पडतो. देऊळाच्या प्राकाराला दक्षिण दिशेस दार आहे.

**७) शहापूरच्या मारुती**

कराड मसूर रस्त्यावर १५ की.मी. च्या अंतरावर मसूरपासून ३ की.मी. अंतरापासून शहापूरच्या फाट्याहून १ की.मी. लांब हे मारुतीचे देऊळ आहे. ११ मारुती मधल्या मारुतीमध्ये सर्वात पहिले या मारुतीची स्थापना केली आहे. या मारुतीला चुन्याचा मारुती देखील म्हटले जाते. या गावाच्या एका टोकांवर नदीच्या काठाला मारुतीचे देऊळ आहे. देऊळ आणि मारुतीची मूर्ती दोन्ही पूर्वाभिमुखी आहे. ७ फुटाची ही मूर्ती काहीशी उग्र दिसते. या मूर्तीच्या पुढील पितळी उत्सव मूर्ती आहे. मारुतीच्या मूर्तीच्या मस्तकी गोंड्यांची टोपी आहे. येथून जवळच रांजण खिंड आहे. येथून २ दगडी रांजण दिसतात ह्याचा जवळच्या टेकडीवर समर्थांचे वास्तव्य असतं.

**८) बहे बोरगावचा मारुती**

सांगली जिल्ह्यातील वाळवे तालुक्यात बहे गावा जवळ बोरगांवामुळे त्याला बेह बोरगाव म्हटले जाते. इथल्या मारुतीच्या स्थापनेच्या मागे एक आख्यायिका आहे. ती रामायणाशी संलग्न आहे. रावणाचा वध करून श्रीराम अयोध्येला परतांना इथे बोरगावास वास्तव्यास होते. कृष्णानदीला त्यावेळी वाळवंट होते. श्रीराम संध्यास्नान करत असताना कृष्णेला पूर येतं तेव्हा मारुतीने आपले दोन्ही बाहू अडवून नदीच्या प्रवाहाला धरून ठेवले. ते प्रवाह दोन्ही बाजूस विभक्त झाले. त्यामधून एक बेट तयार झाले. आणि या क्षेत्राला बहे असे नाव मिळाले.

या जागी मारुतीचे समर्थांना मूर्तिरूपात दर्शन झाले नाही तेव्हा त्यांनी डोहात उडी मारून मारुतीची मूर्ती त्या डोहातून काढून स्थापित केली. मारुतीचे दोन्ही हात पाणी अडविण्याचा पावित्र्यात दिसून येतात डोक्यावर मुकुट हात दोन्ही मांड्यांचा बाजूला धरलेले. अशी ही भव्य मूर्ती दिसते. इथे जाण्यासाठी कृष्णानदीच्या वरील पुलाच्या पश्चिमेकडील बंधाऱ्यावरून बेटावरून जावे लागते. नदीस पूर आल्यास इथे जाणे शक्य नसते.

**९) मनपाडळेचा मारुती**

मनपाडळे आणि पारगाव कोल्हापूर जिल्ह्यात पन्हाळगड -ज्योतिबाच्या परिसरात आहे. कोल्हापूर ते वडगाव वाठारपासून पुढे १४ की.मी.च्या अंतरावर हे मनपाडळे आहे. ११ मारुती पैकी सर्वात दक्षिणे दिशेस असलेल्या या मारुती देऊळाची स्थापना समर्थानी केली ५ फूट उंच असलेली ही साधी सुबक मूर्ती आणि देऊळ उत्तराभिमुखी आहे. मूर्ती जवळ दीडफुटी उंच कुबडी ठेवलेली आहे. जवळपास ओढ्या काठी सुंदरसे कौलारू देऊळ आहे. औरसचौरस असलेल्या गाभाऱ्याचे ह्या देऊळात नवीन बांधकाम केलेले सभामंडप देखील आहे.

**१०) पाडळी मारुती**

वारणेच्या खोऱ्यात असलेल्या मनपाडळे गावाच्या जवळच पाडळी गावात मारुतीची मूर्ती आहे.

**११) पारगावाचा मारुती**

यालाच बाळमारुती किंवा समर्थांच्या झोळीतला मारुती असे म्हणतात. कराड-कोल्हापूर रस्त्यावर वाठार गाव जवळ नव्या पारगावाजवळ जुने पारगाव आहे त्यात ही मारुतीची मूर्ती आहे. ११ मारुतींपैकी शेवटची आणि सर्वात लहान अशी ही मूर्ती सपाट दगडवर कोरलेली दीड फुटीची मूर्ती आहे. शेंदूर नसून केसांची शेंडी बांधलेली दिसते. मारुतीराया जणू डावीकडे धावत निघाल्याचा आविर्भावात ही कोरलेली आहे. मनपाडळे ते पारगाव अंतर ५ की.मी.चे असून वळसा घेलेला रस्ता आहे.

या ११ मारुती शिवाय समर्थांनी गोदावरी काठी, टाकळी येथे गोमयाचा मारुतीची स्थापना केली आहे. एकदा तरी आपण ११ मारुतीचे दर्शन करावे. असे आवर्जून सांगावे वाटते.

या अकरा मारुती मंदिराची वैशिष्ट्य आहेत. समर्थांच्या समोर काही गोष्टी होत्या त्या अनुषंगाने १७ व्या शतकात या अकरा मारुतीची स्थापना केली ( १६४५ ते १६९१ ) महाराष्ट्रातील तरुणांमध्ये तंदुरुस्ती जाणीव करणे, मारुतीच्या उपासनेतून सुदृढ शरीर स्थिर मन आणि याची माहिती लोकांपर्यंत पोहोचविली तसेच हनुमंताच्या कृपेने बलोपासनेतून कणखर माणसे घडावेत यासाठी समर्थांनी ठिकठिकाणी मारुती मंदिराची स्थापना केली. संकटमोचन हनुमंताला आपण मानवजातीच्या कल्याणासाठी प्रार्थना करु.



– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com



आनंदी पहाट...


## संस्कृती संस्कारांवर आधारलेली असते

**ज्योतिर्मय साहित्य**

संस्कारांशिवाय जीवन भरकटलेल्या जहाजाप्रमाणे, विमानाप्रमाणे असते, एकप्रकारे विमनस्क अवस्थेतील मन कोणतीही पातळी गाठू शकते. आपली संस्कृतीसुद्धा संस्कारांवर आधारित असते. संस्कार म्हणजे आपल्या अंतर्मनावर सामाजिकदृष्ट्या महत्वाच्या आणि उपयुक्त ठरतील अशा चांगल्या सवयी, असे म्हणता येईल. आपल्यामध्ये यासाठी आवश्यक ते सद्गुण असणे जरुरीचे असते. अशा गुणांचा केवळ व्यक्तिगत लाभ होत नसतो, तर समाजातील प्रत्येक घटक लाभार्थी ठरत असतो. विचारांचा पाया मजबूत असलेल्या व्यक्तीच्या मानसिक कळसाची उंची मोजणे सहज शक्य होतेच असे नाही. अशा व्यक्तीपेक्षा त्या व्यक्तीच्या विचारांचेच आकर्षण, कौतुक आणि आदर अधिक असल्याचे दिसून येत असते. ह्याची जाणीव आपण ठेवणे आवश्यक असते. अशी वैचारिक प्रगल्भता प्राप्त करणाऱ्यांपैकी आपणही एक असायला काय हरकत आहे, असा विचार आपल्या मनात यायला हवा. विचारवंतांच्या वैचारिक बैठकीत सामील व्हायला कसे मिळेल, ह्याच दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात येणे महत्वाचे ठरते. कारण, अशा विचारवंतांच्या वैचारिक, मानसिक कळसाला स्पर्श करून येणारा प्रकाशाचा, आशेचा प्रत्येक किरण मार्गस्थ होण्यासाठी अनेकांना योग्य दिशा दाखवत असतो. दशदिशांपैकी कोणत्याही दिशेने मार्गस्थ झाले, तरीही यश प्राप्तीच्या मार्गाचे दर्शन होतच राहते. आपल्या अंतर्मनाला संस्कारच शिस्त लावत असतात. एक विशीष्ट आकार, दिशा आणि गती प्राप्त करून देत असतात. मुळातच ह्या विचारांची व्याप्ती आपण समजून घेणे सर्वप्रथम जरुरीचे असते. आपल्या प्रत्येकाच्या जीवनांत अंतर्मानावरील संस्कार खूप महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. त्याशिवाय आपल्या विचारांमध्ये परिपक्वता येतेच असे नाही. संस्काराशिवाय जीवनमूल्य शून्य ठरत असते. संस्कारच आपल्याला श्रेष्ठ बनवत असतात, उत्तम आकार देत असतात. आपल्या सर्वोत्तम जीवनाचा पाया उत्तम संस्कारांवरच अवलंबून असतो.

## आनंदाची गुढी

**ज्योतिर्मय साहित्य**




अधर्म आणि दोष नष्ट करणारी सुखाची गुढी मी उभवितो. कोणाकडून ? तर सज्जनांकडून. सुखाची गुढी सज्जनच उभारू शकतात. संत नामदेव, संत जनाबाई, संत चोखामेळा यांच्या वाङ्मयातही गुढीचे उल्लेख आढळतात. चोखोबा तर म्हणतात–

टाळी वाजवावी, गुढी उभारावी, वाट ही चालावी पंढरीची ।

चौऱ्याऐंशी लक्ष योनीतुन प्रवास करून आल्यानंतर दुर्लभ असा मानवदेह प्राप्त होतो. नरदेह प्राप्त होणे म्हणजे आनंदाची गुढी ! म्हणून भगवंताच्या भक्तीत रंगून जाऊन आनंदाने टाळी वाजवावी.




गुढी हे मानवी देहाचंही प्रतीक आहे. आपल्या पाठीतून जाणारा मेरुदंड म्हणजे वेळू किंवा काठी. त्यावर आपले डोके म्हणजे घट. गुढीवरचे रेशमी वस्त्र म्हणजे जणू मानवी देह. त्यावर असणारी कडुलिंबाची आणि आंब्याची पाने म्हणजे मानवी जीवनातील सुखदुःखाचे प्रतीक. गुढीला घातलेला साखरेचा हार किंवा गाठी म्हणजे परमेश्वराचे प्रतीक. जेव्हा आपण आपली सुखदुःखे त्या परमेश्वररूपी साखरेच्या गोड चवीबरोबर मिसळून घेतो, तेव्हा जीवनही गोड, अमृतमय होते. आरोग्याच्या दृष्टीनेही कडूलिंबाच्या पानांचे महत्व आहे. लिंबाची पाने चवीला कडू असली तरी गुणधर्माने थंड आहेत. पुढे सुरु होणाऱ्या कडक उन्हाळ्याला तोंड देता यावे म्हणून कडुलिंबाच्या पानांची चटणी गूळ, मीठ, मिरपूड इ. घालून खातात.

संत एकनाथांच्या रचनांमध्ये तर अनेकवेळा गुढीचा उल्लेख आपल्याला आढळतो. जेव्हा आपण काहीतरी विशेष अशी गोष्ट साध्य करतो, तेव्हा विविध रूपांमध्ये गुढीचे प्रतीक त्यांना भासमान होते. मग ती गुढी हर्षाची, ज्ञातेपणाची, भक्तीची, यशाची, रामराज्याची रोकडी, जैताची, वैराग्याची, भावार्थाची, स्वानंदाची, सायुज्याची, निजधर्माची अशी विविध प्रकारची आहे. गुढी वारीत आणि रणांगणातही उभविली जाई. जशी एखादी ज्योत ( बॅटन ) खेळाडूंकडून पुढे नेली जाते, तशीच ती चपळ माणसांच्या हस्ते युद्धात आणि वारीत पाठवण्यात येई. त्याद्वारे काही संकेत दिलेले असत. तुकाराम महाराज आपल्या अभंगात म्हणतात –

पुढे पाठविले गोविंदे गोपाळा । देऊनिया चपळा हाती गुढी ।।

शालिवाहन राजांची गोष्ट तर प्रसिद्धच आहे. शालिवाहनांच्या राज्यात अपार समृद्धी होती. पण त्यामुळे प्रजेत आळस आणि सैन्यामध्ये उत्साह आणि चपळता राहिलेली नव्हती. कुठलीही गोष्ट एकाच ठिकाणी वापर न होता पडून राहिली की ती गंजते किंवा बिनकामाची ठरते. तसेच शालिवाहनाच्या सैन्याचे झाले होते. शत्रूच्या आक्रमणाला तोंड देण्याचे सामर्थ्य त्यांच्यात राहिले नव्हते. अशातच शकांचे आक्रमण राज्यावर झाले. मग काय करायचे ? सैन्याला प्रशिक्षण द्यायचे किंवा नवे सैनिक भरती करायचे तर काही वेळ जाणारच. मग शालिवाहनांनी हजारो मातीचे सैनिक, हत्ती, घोडे तयार केले. त्याच्या साहाय्याने त्यांनी जुलमी अशा शकांचा पराभव केला. मग तो विजय लोकांनी गुढया तोरणे उभारून साजरा केला. तेव्हापासून शालिवाहन शक सुरु झाला. पण खरंच मातीचे सैनिक, हत्ती, घोडे लढले असतील का ? मला वाटतं त्याचा प्रतीकात्मक अर्थ आपण घ्यायला हवा. शालिवाहन राजाचे सैन्य मृत्तिकेसमान म्हणजे चैतन्यहीन, निरुत्साही झाले होते. त्यांच्यात मरगळ आली होती. मातीच्या सैन्यात प्राण फुंकणे म्हणजे त्यांच्यातील चैतन्याला आवाहन करणे, त्यांच्यातील स्वत्व, स्वाभिमान, शौर्य, देशाभिमान जागृत करणे. किती सुंदर अर्थ आहे हा !



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६


## स्वगुण परीक्षा

**ज्योतिर्मय साहित्य**

विषय शब्दाचा अर्थ पाहू गेल्यास''विशेषेण सिंचन्ति इंद्रियाणि मनश्च'' ज्याच्या ठिकाणी इंद्रिये व मन बुडून जातात मग्न होतात म्हणजे इंद्रीयभोग अर्थात देहातून सुख घेण्याची आवड. कधीही समाधान न होणाऱ्या आशेच्या साखळीने माणुस बांधलेला असतो. भगवंताचा विसर पडणे म्हणजे वाईट काळ समजावा. आत्मबुध्दी विसरून देहबुद्धी त जाण म्हणजे स्वर्गातुन नरकात पडण्या सारखे आहे. समर्थानी दहाव्या ओवी पासुन अठराव्या ओवी पर्यंतचा प्रवास म्हणजे शरिराच्या जन्माची क्रीया ते समजून घेत असताना आपल्याला आपल्याच शरीराची किळस येते. शरीर वरवर कितीही चांगले वाटलेतरी त्यात डोकावून पहाता ते किती घाणीचै साम्राज्य आहे. हे वरील ओव्या वाचताना खात्री पटते. घाणीने भरलेले हे शरीर कितीही निर्मळ करायचा प्रयत्न केला तरी ते स्वच्छ होत नाही. समर्थींनी डोकं या अवयवाला मात्र ऊत्तमांग म्हणलं आहे. मल मुत्र ओक हे जर शरिराचे झाले नाही तर मनुष्य लवकरच मरेल. **क्रमश:**

अठ्ठावीस ओव्याच्या पुढे तर आईच्या गर्भात जीवाचे कसे हाल होतात याचे वर्मन केले आहे. आईच्या गर्भात असताना मुल सोह,सोहम् असं म्हणते मी तो आहे मी ईश्वर आहे. आणि बाहेर पडल्यावर ते ''कोहं कोहं '' म्हणू लागते.जीवाला देहबुद्धी येते. व स्वस्वरूपाची जाणीव मावळू ् या लागते. देह विकार विकसीत होऊ लागला की सुखदुःखाचे हेलकावे बसु लागतात. यातुन सुटण्याचा ऐकचं मार्ग तो म्हणजे ''भगवंताला शरण जाणे''

सन्माननीय वाचक मंडळी तुमच्या सगळ्यांच्या प्रोत्साहननाने व समर्थाच्या आशिर्वादाने आज तिसरा दशक तुमच्या हाती देताना खुपच आनंद होत आहे गेल्या दोन महिन्यांत माझ्याच शरिराच्या काही भागाने असहकार पुकारल्यामुळे मी तुमच्या समोर व्यक्त होऊ शकले नाही. त्याबद्दल क्षमस्व



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## अखंड समाधानाचा मार्ग ।

**ज्योतिर्मय साहित्य**

चित्तात राखावे समाधान ।। चित्तांत ज्याचे राहिले समाधान । तोच भगवंताचा आवडता जाण ।। ज्याचा विश्वास रामावरी । त्याला समाधान स्वीकारी ।। माझे हित रामाचे हाती हा धरिता विश्वास । समाधान मिळत असे जीवास ।। दुःख ही परमात्म्याची इच्छा जाणून जो भगवंताचा झाला । त्याला देह प्रारब्धावर टाकता आला ।। प्रारब्धाने देहाची स्थिति । हे सर्वच सांगती । पण त्यात मानता येते सुख समाधान । ध्याता एक रघुनंदन ।। तात्पुरते काही तरी औषध घ्यावे । देहाच्या लोभात न सापडावे ।। माझे सांगणे दुजे नाही । जोवर श्वासोच्छवास देही । तोंवर मुखी नाम पाही ।। तरीपण मी सांगतो एक । ठेवावा रामावर विश्वास । तोच साह्यकारी होईल खास ।।

असावे शुद्ध आचरण । करावे भगवंताचे स्मरण ।। कर्तव्याची ठेवावी जागृति । त्यात भगवंताची राखावी स्मृति ।। नामाविण नाही दुजे साधन । हे सांगत आले सर्व संतजन ।। देहाचे अस्तित्व भगवंतासाठी। याहून नाही दुजी उच्च प्राप्ति ।। देहाचे भोग देहाचे माथी । ऐसे सर्व सांगती । परि एक वाटतसे चित्ता । ते दूर होतील एक भगवंत चिंतिता ।। भगवंतावाचून देहाचे सुखभोग । हे न मानिती साधुसज्जन ।। आता जगणे रामासाठी । हा निश्चय मानावा चित्ती ।। जगातील वैभव ऐश्वर्य संपत्ति । लौकिक आणि कीर्ति । हे परमात्म्यावाचून मातीमोल साधुसंत गणती ।। आजवर झाले कष्ट फार । देहाचा भरवसा धरून थोर ।। देहाचे सुखसौख्य आदरसत्कार । हे प्रारब्धाधीन सत्य जाण ।। मुलींनी खेळ मांडला । परि नाही कामाला आला । तैसा प्रपंची थोर झाला । परमात्म्याचा तो न म्हणावा भला ।। रामापरते सत्य नाही । श्रुतिस्मृति सांगतात हेच पाही ।। आता न ठेवावा जगी भरवसा । राम सखा करावा खासा ।। रामाविण अन्य प्रीति । उपजे देहबुद्धीचे संगती ।। आता राम एकच करी ।। तुझा विसर न पडो अंतरी ।। आता जसे असेल तसे होऊ द्यावे । रघुनाथभजनी असावे ।। मागील झाले होऊन गेले । पुढील येणार येऊ द्यावे भले ।। आत न धरावा हव्यास । हेच वाटे जीवास ।। जे जे करणे आणिले मनी । रामकृपे पावलो जगी । माझे आता काही । दुसरे मागणे नाही।। माझे कोणी नाही । मी कोणाचा नाही । जग आणि देह अगदी माझे नाही ।। जे जे काही दृश्य पहावे। त्याचे रूपांतरच व्हावे । हा नेहमीचा अनुभव ठेविता चित्ती । समाधानाची होय प्राप्ती ।।

जोवर श्वासोच्छ्वास देही। तोवर मुखी नाम पाही।।

***

संस्कृती व संस्कार



विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७

## गोष्टी प्राण्यांच्या ७

**ज्योतिर्मय साहित्य**

या सापाने साथ मात्र सोडली नाही. आम्ही नवीन घरात रहायला आलो त्या वेळी हे महाराज सातत्याने दर्शन द्यायचे. निरनिराळ्या झाडांवर फिरत असायचे. आणि छोटी मुले त्यांच्या मागे दिवसभर फिरायची. शेवटी तो सगळ्यांची नजर चुकवून एखाद्या बिळात शिरायचा. आणि ही मुले घरी यायची.

एकदा मी घरात असतांना मुलगा सांगत आला, ''आई काल सिनेमात बघितला तसा साप आपल्या दारात बसला आहे. आदल्याच दिवशी आम्ही सतीचे वाण सिनेमा पाहिला होता. प्रथम मी दुर्लक्ष केले. पण तो पुन्हा पुन्हा हाताचा फणा करून तेच सांगत होता. म्हणून जाऊन बघितले तर खरेच दारात नागोबा फणा काढून बसले होते. काही वेळ आम्ही एकमेकांच्याकडे बघत होतो. शेवटी तो हळूच निघून गेला. हे साहेब एकदा तर घरात शिरले होते. मी घरात नव्हते मुलगा एकटाच होता. त्यावेळी तो साधारण ७/८ वर्षाचा असेल. साप घरात येताना बघून मुलगा आपले पाय खुर्चीवर घेऊन बसला. आणि साप कुठे जात आहे त्याकडे लक्ष देत बसला. साप त्याच्या खुर्ची खालून सरळ बाथरुम मध्ये शिरला. मुलाने दरवाजा लावून त्याला तिथे बंद करून ठेवले. आणि शेजारच्या मामाला बोलावून आणले. आणि सर्व शेजाऱ्यांनी मिळून त्या सापाला मारले आणि टायर मध्ये घालून जाळले होते. मी घरी आल्यावर हे काय आहे विचारले. त्यावेळी ''हे तुमच्या घरात शिरले होते.'' असे सर्वांनी सांगितले. आणि तो विषारी असल्याने त्याला मारले होते. असे लक्षात आले, की ते आपल्या घरात येत नसून आपणच त्यांच्या घरावर अतिक्रमण केले आहे. मग आम्ही सर्वांनी ठरवले साप मारायचा नाही. म्हणून प्रत्येकाने आपल्या घराबाहेर मोठ्या तोंडाच्या बाटल्या ठेवल्या. आणि त्या बाटल्यांचे योग्य उपयोग होऊ लागले.

एकदा मी व शेजारीण सकाळी बाहेर खराटा घेऊन झाडत होतो. झाडून झाल्यावर शेजारणीने आपला खराटा आपटला तर त्यातून साप पडला. कदाचित खराट्या मुळे तो मरगळला होता. आम्ही फक्त एकमेकींकडे बघितले. मी लगेच घराबाहेर ठेवलेली बाटली घेऊन आले आणि ती बाटली जमिनीलगत ठेवली. शेजारणीने त्या सापाला मागून झाडू लावला तर तो लगेच बाटलीत शिरला. लगेच बाटलीचे झाकण बंद करून त्याला बाटलीत भरुन ठेवले. आणि आम्ही दोघी आपल्या कामाला लागलो. त्या दिवशी घरासमोरून जाणारे येणारे त्या सापाकडे बघून आज इथे निघाला आहे असे म्हणत पुढे जात होते.

आता सगळीकडे घरे, इमारती झाल्यामुळे साप दिसणे दुर्मिळ झाले आहे. तरीही कधी कधी सोसायटीत असलेल्या बागेत गेल्यावर दिसतो. पण ते दर्शन दुर्मीळच झाले आहे.

***



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

**उद्भासिताखिलखलस्य विश्रुङ्खलस्य**
**प्राग्जातविस्तृतनिजाधमकर्मवृत्तेः ।**
**दैवादवाप्तविभवस्य गुणद्विषोऽस्य**
**नीचस्य गोचरगतैः सुखमाप्यते कैः ।।**

अर्थ – जो सर्व दुष्टांना प्रोत्साहित करतो, नियमांविषयी प्रतिबद्ध नाही, ज्याने दैवयोगाने ऐश्वर्य प्राप्त केले आहे, जो गुणांचा द्वेष करतो, अशा अधमव्यक्तीजवळ राहून कोणास सुख मिळेल? अर्थात कोणासही नाही.

दुर्जनाजवळ राहून कोणीही सुखी होऊ शकत नाही. नियमरहित अर्थात अनियंत्रित अशा स्वकर्माने अर्जित नव्हे, तर दैवयोगाने म्हणजे वडिलोपार्जित ऐश्वर्य प्राप्त केलेल्या गुणद्वेष्ट्या व्यक्तीच्या सहवासात कोणीही सुखी होऊ शकत नाही, असे प्रतिपादन कवीश्रेष्ठ भर्तृहरींनी या श्लोकात केले आहे.




## वैद्यकीय औषधी वनस्पती – तुळस

**ज्योतिर्मय साहित्य**

तुळशीच्या पानांना भारतात धार्मिक महत्त्व आहे, पण ते औषध म्हणूनही खूप वापरले जातात. तुळशी ही एक अशी वनस्पती आहे, जी प्रत्येक घरात सहज आढळते. तुळशीला पवित्र तुळस असेही म्हणतात.

आणि तुळशीचे फायदे खूप चमत्कारिक आहेत.

तुळशीच्या औषधी गुणधर्मामुळे, अनेक आयुर्वेदिक आणि निसर्गोपचार रुग्णालयांमध्ये औषधी वनस्पती बनवण्यासाठीही तिचा वापर केला जातो. या वैद्यकीय औषधी वनस्पती च्या अनेक जाती आहेत, त्यापैकी राम तुळशी आणि कृष्ण तुळशी सर्वात सामान्य आहेत. पण दोघांमध्ये काय फरक आहे आणि चांगल्या आरोग्यासाठी तुम्ही कोणता निवडावा?

राम तुळस आणि कृष्ण तुळस यांच्यातील फरक असा आहे –

राम तुळशीचा वापर बहुतेक पूजेत केला जातो. ही तुळस त्याच्या औषधी गुणधर्मांसाठी प्रसिद्ध आहे. तुळशीच्या या जातीच्या पानांना गोड चव असते. श्यामा तुळशीला गडद तुळशी किंवा कृष्ण तुळशी असेही म्हणतात. या तुळशीची पाने हिरवी व जांभळ्या रंगाची असून त्याची देठ जांभळ्या रंगाची असते.

''राम तुळशीला हिंदू धर्मात औषधांचा रामबाण उपाय म्हटले जाते. धार्मिक पूजेसाठी याचा वापर केला जातो.''

''कृष्ण तुळशीला जांभळ्या तुळशीचे पान म्हणूनही ओळखले जाते. ही तुळस कमी वापरली जाते, पण तिचे अनेक औषधी फायदेही आहेत.''

कोणती तुळस फायदेशीर आहे –

''दोन्ही तुळशींचे औषधी फायदे आहेत. ''दोन्ही तुळस ताप, त्वचा रोग, पचन आणि रोगप्रतिकारशक्ती बरे करण्यासाठी वापरली जातात. चिंता आणि तणाव कमी करण्यासाठी देखील याचा वापर करतात. वजन कमी करण्यासाठी तुळशीचे पाणी वापरले जाते, याच्या सेवनाने सर्दी–खोकलाही दूर होतो.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

तुळशीला फायदेशीर आणि निसर्गाची देणगी असल्याचे मानले जाते. राम तुळस पचनासाठी फायदेशीर असल्याचे सांगितले. कृष्ण तुळस त्वचारोग आणि इतर अनेक आजारांवर औषधी आहे.

''राम तुळस एक नैसर्गिक बूस्टर आहे. ती तणाव आणि उच्च रक्तदाब कमी करण्यासाठी वापरली जाते. त्यात कर्करोगविरोधी गुणधर्म आहेत आणि चांगले आरोग्य आणि पचन सुधारण्यास मदत करते.

कृष्णा तुळस बर्याचदा लहान मुलांना खायला दिली जाते. सर्दी–खोकल्याचा त्रास, खूप तापावरही हे फायदेशीर आहे. त्यातील अँटी–ऑक्सिडंट गुणधर्म हृदयाच्या समस्या आणि मधुमेहासाठी देखील चांगले आहेत. यामुळे त्वचा चमकदार होते आणि केसांची लांबीही वाढते.

कसे सेवन करावे –

''तुळशीची दोन–तीन पाने रोज रिकाम्या पोटी खावीत. त्याचा चहा बनवता येते. रक्त स्वच्छ होण्यास मदत होते.''

***




**ज्योतिर्मय साहित्य**

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

परमार्थ याची व्याख्या आम्हास माहीत नाही.परमात्म स्वरूपास जाणण्यासाठी जे कांहीं करू ती साधना असते. नाथ महाराजानी अयोध्या कांडात काय घ्यावे ? हे सांगितले आहे.

तू राज्यावर बसणार नाहीस हे, कैकयी सांगते म्हणाली. रामास बोलावून आणा हे सुमंताला सांगण्यात आले.

रामाचा महालाला १४ दारे होती. प्रभू रामाचे दर्शन व्हावे आणि कृपा व्हावे यासाठी या चौदाही दारातून आत प्रवेश करावा लागणार होता.

(सुमंताचे निमित्त करून नाथ म. प्रभू दर्शन व प्रभू कृपा होण्यासाठी काय काय करणे गरजेचेआहे हे सांगतात) त्यातील पहिली ७ दारे कांहीं त्यागाची समजावीत असे नाथांनी त्यांच्या रामायणात सांगितलेआहे.

रथ, छत्र, चामर, मी पण, विकार ही सोडत सोडत गेले तर ७ व्या दारानंतर केवळ प्रभूचे दर्शन होते. पुढील ७ दारे ही ७ गुण अंगी बाणन्यासाठी सांगण्यात येतात. नंतरच प्रभू कृपेस आपण प्राप्त होतो. केवळ दर्शन पहिल्या ७ दारानंतरच होते.


आमच्या जीवनात अनुकूल व प्रतिकूल स्थिती येते.


वाल्मिकिना राम नामाचे चिंतन झाले आणि त्यांना राम कथा लिहिण्याचा अधिकार प्राप्त झाला.

तामस नदी तीरावर सीता त्याग झाल्यानंतर वाल्मीक बसले होते नदीवर एक क्रौच नरास शिकारी मारतो .मादी आक्रोश करते. तेंव्हा वाल्मीक ऋषी यांच्या मुखातून शापवाणी श्लोक रूपाने बाहेर पडली.

सीता मातोश्रीच्या त्यागा नंतर ही कथा सुरू होते.

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

उमा एकदा गुपचूप दार बंद करून वहीत काहीतरी लिहिते आहे हे त्या पाहतात आणि प्यारीमोहनला सांगतात. प्यारीमोहन हा जुनाट विचारांचा तरुण आहे. त्याला वाटतं की एकदा लिहिणं वाचणं सुरु झालं की घरात नाटक-कादंबऱ्या येणार आणि संसाराकडे दुर्लक्ष होणार. त्याचे असेही मत होते की स्त्रीशक्ती आणि पुरुषशक्ती यांच्या मिलनातून पवित्र अशा दाम्पत्यशक्तीचा उदय होतो. पण स्त्रीनं शिक्षण घेतल्यास स्त्रीशक्ती पराभूत होते आणि फक्त पुरुषशक्तीच निर्माण होते. पुरुषशक्तीचा पुरुषशक्तीशी संघर्ष होऊन अशी प्रलयशक्ती निर्माण होते की ज्यामुळे दांपत्यशक्ती विनाशशक्तीत विलीन होते आणि मग स्त्री विधवा होते.

तसा तर त्याच्या या विचारांना काहीच शास्त्रीय आधार नव्हता पण त्याला कोणी विरोधही करू शकत नव्हतं. ही त्या काळातली समाजाची आणि पुरुषी मानसिकताच होती. उमेकडून तिची वहीच हिसकावून घेतली जाते. वही कसली, तर तिचा आनंद आणि जगण्याचा आधारच एक प्रकारे हिरावून घेतला जातो. कथेत शेवटी रवींद्रनाथ म्हणतात, प्यारीमोहनचीही सूक्ष्मतत्त्वकंटकीत विविध लेखांनी परिपूर्ण अशी एक चोपडी होती. ती काढून घेऊन माणसांच्या हिताचं काम करणारं मात्र कुणीच नव्हतं. इथे वाचकाला अंतर्मुख करण्याची रवींद्रनाथांची ताकद आपल्याला दिसते.

त्यांची महामाया या नावाची एक सुंदर कथा आहे. महामाया ही एक सुंदर तरुणी या कथेची नायिका आहे. ती सुंदर तर आहेच, पण तेजस्वी आणि बाणेदार आहे. ती चोवीस वर्षांची झाली आहे, पण तिचं लग्न राहिलं आहे.

# ज़िंदगी और कुछ भी नहीं.....

ज्योतिर्मय साहित्य

कुछ पाकर खोना है, कुछ खोकर पाना है
जीवन का मतलब तो आना और जाना है....
दो पल के जीवन से एक उम्र चुरानी है
ज़िंदगी और कुछ भी नहीं, तेरी-मेरी कहानी है...

काल सकाळी चित्रपट अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते मनोजकुमार यांचे निधन झाल्याची बातमी धडकली. काही क्षण विश्वास बसेना. समाज माध्यमात त्यांच्याविषयी फोटोसहीत पोस्ट शेअर होऊ लागल्या. भावपूर्ण श्रद्धांजली अश्या प्रतिक्रियां येऊ लागल्या. मी माझ्या पत्रकार मित्राला विचारले. त्याने मनोजकुमार गेल्याचे खरे आहे, हे सांगितले.

मला वाईट वाटले. माझ्या आवडीचा कलाकार होता तो. त्याला मी गुरू मानून माझ्या लेखनाला सुरूवात केली होती.त्यांचे क्रांतीपर्यतचे सारे चित्रपट तीन चार वेळा पाहीलेत, त्यानंतर त्यांच्या चित्रपटाची कथा मी माझ्या भाषेत अर्थात मराठीत लिहून काढत होतो. त्यांची गाणी मराठीतून भाषांतर केली होती.

बस यही अपराध मैं हर बार करता हूं
आदमी हूं आदमी सें प्यार करता हूं

हा माझा अभ्यासाचा भाग होता. एकलव्याप्रमाणे माझे शिक्षण सुरू होते. तीन चार वह्या भरल्या होत्या. मागे एकदा माझ्या मित्राला वह्या वाचायला दिल्या होत्या. त्याने त्या वह्या परत आणून दिल्या नाहीत. तो म्हणाला,

" सॉरी यार त्या वह्या माझ्याकडून हरवल्या."

आता काय करणार? मी खूप नाराज झालो. माझे स्वप्न भंगले. त्यांनी रंगवलेले स्वप्न मला पूर्ण करावयाचे होते.

मैं बसाना चाहता हूं स्वर्ग धरती पर
आदमी जिसमें रहें बस आदमी बनकर
उस नगर कि हर गली तैयार करता हूं

मी हरलो नाही अथवा गप्प बसलो नाही. पुन्हा



पुन्हा चित्रपट पाहीले. पुन्हा पुन्हा कथा नि गाणी लिहून काढल्या आहेत.

उठकर गिरना
गिरकर उठना
ये जीवन की रीत पुरानी हैं

रोहिदास कवळे
मुंबई

मला मनोजकुमार समजून घ्यायचा होता.तोच त्याच्या एका गाण्यात भेटला.मला खूप आनंद झाला.

गंगा से भी पावन मजदूर का पसिना
पानी ना समझे अनमोल ये नगिना
ऐसे ही पसिनो के निर्माण में मिलेगा
वो खेत में मिलेगा...

प्रत्यक्षात मला संपूर्ण मनोजकुमार भेटलाच नाही, भेटला तो तुकड्या तुकड्यातून. तो ब्रॅंड झाला होता, देशभक्तीचे...

हो कोई हम प्रांत के वासी
हो कोई भी भाषाभाषी
सबसे पहले हैं भारतवासी

हे सांगायला तो विसरला नाही. हे सांगत असताना

जिस देश का बचपन भूखा हो
उस देश की जवानी कैसी होगी?

याची आठवण करून दिली. त्याने व्यवस्थेला प्रश्न विचारला होता. फाळणीचे चटके त्यांनी सहन केले होते. अगोटाबाद (आता पाकिस्तान) येथून वयाच्या दहाव्या वर्षी भारतात आला. निर्वासितांच्या छावणीत राहीला. वाढला. ते अश्रू कधीच विसरला नाही. हे सर्व ते आपल्या चित्रपटात मांडत होते.

इस दुनिया में जीनेवाले
ऐसे भी जीते हैं
रुखी सुखी खाते हैं
और थंडा पानी पिते हैं

त्यांचा अभिनय एकदम संयम. कुठे अक्रताळेसपणा नाही. त्यांच्या अभिनयात दिलीपकुमारची झलक दिसते.कुठल्याही नायिकेबरोबर अनावश्यक मिठ्या नाहीत, किंवा चुंबन नाही. प्रेम हाताळतानाही संयम होते.

कोई जब तुम्हारा हृदय तोड दे
तडपता हुआ जब कोई छोड दे
तब तुम मेरे पास आना प्रिये
मेरा दर खुला हैं, खुला ही रहेंगा तुम्हारे लिए

पती पत्नीचे नात्यात त्यांनी हळुवारपणा दाखवला आहे. कुठेही एकमेकांना दुखावले नाही, एकमेकांना आधार दिला आहे. आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना आधार हवा असतो.

जीवन की डगर पे
तुझको साथी की जरुरत होंगी
दिया कैसे जलेगा अकेले?
बाती की जरुरत होंगी
मैं बनुंगी प्रिया तेरे पथ का दिया
दिया पथ में जलाने दे
मुझे साथ को आने दे...

शोर या चित्रपटात मुलाला ऑपरेशन करण्यासाठी दवाखान्यात नेण्याआधी एका बापाची जी घालमेल आणि मनोवस्था दाखवली आहे, डोळ्यात आसवे जमा होतात.जिंदगी और कुछ मी नही...या गाण्यात खिडकीतून दिसणाऱ्या लाल प्रकाशात लुकलुकणाऱ्या नव जीवन या जाहिरात बोर्डाचा वापर केला आहे आणि त्या पाठोपाठ व्हॉयोलिन वाजवणाऱ्या बापाचा फोटो झळकतो.नव जीवनचा लाल प्रकाश बापाच्या चेहऱ्यावर पसरतो. बापाची वेदना गडद होताना दिसते. हे सारे मनोजकुमार टच आहेत, तिथे मनोजकुमारला सलाम करावासा वाटतो.

मी वर उल्लेख केला आहे की क्रांतीपर्यतचे चित्रपट पाहीले आहेत. त्यानंतरचे चित्रपट पाहीले नाहीत. नंतरच्या चित्रपटात पाट्या टाकलेल्या दिसतात. ओढून ताणून देशभक्ती आणलेली दिसते. मजा येत नाही. कलयुग और रामायण या चित्रपटात कथेचा विषय चांगला असूनही समांतर सेंसॉर बोर्डाच्या हस्तक्षेपामुळे संपूर्ण चित्रपटाचा विचका झाला. चित्रपटाच्या नावापासून नायक नायिकेचे नाव बदलेले गेले. या चित्रपटाचे आधीचे नाव कलयुग की रामायण असे होते. रामाचा रामन झाला, सीतेचे सविता झाली. संपूर्ण चित्रपटाची मजा गेली. समांतर सेंसॉर बोर्डापुढे मनोजकुमार झुकले, हे मला रूचले नाही. अर्थात यात मनोजकुमार यांचा दोष नव्हता. अर्थकारण हे कारण होते. या चित्रपटासाठी त्यांनी पैसे गुंतवलेले होते. काही का असेना. त्याचे चित्रपट पाहताना मजा यायची, नवं काही शिकायला मिळायचे. मी भरपूर शिकलो.

जीवन चलने गाना,
चलते रहो सुबह श्याम..



## जात्यावरच्या ओव्या......

नातेसंबंध : बहिण-भाऊ

चांदणं चटक
दारी बसले हवेला
मांडीशी देते मांडी
गुज सांगते भावाला ll२६ll

बहिण भावंडाचा
तंटा मोड बाई,
वाडा भर गाई
दादा वाट देत नाही ll२७ll

संदर्भ : कै. गवणाबाई बोराडे
संकलन : सौ मनोरमा बोराडे

# खोलेश्वरच्या स्वराली पुराणिकचे डॉ.होमीभाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेत सिल्व्हर यश

ज्योतिर्मय साहित्य

**अंबाजोगाई** – खोलेश्वर माध्यमिक विद्यालयातील इ. ६ वी अ मधील विद्यार्थीनी कु. स्वराली शैलेश पुराणीक हीने डॉ.होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेत अंतीम फेरीमध्ये जाऊन सिल्व्हर मेडल प्राप्त केले आहे. काल मुंबई येथील यशवंत नाटयमंदिर, माटुंगा येथे सुप्रसिद्ध अणु वैज्ञानिक डॉ.अनिल काकोडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात प्रसिद्ध बायोलॉजिस्ट आनंद डी.घैसास यांच्या शुभहस्ते स्वराली पुराणिक हिला अतिशय भव्यदिव्य अशा कार्यक्रमात सिल्व्हर मेडल प्रदान करण्यात आले. या स्पर्धेतील तिसऱ्या फेरीसाठी तीने शाश्वत लँडस्केपिंग या विषयातंर्गत फुड लँडस्केपिंग हा विषय घेऊन आरोग्यम् धनसंपदा या शीर्षकाखाली पर्यावरणपुरक छोटीशी बाग तयार केली होती.तिला यासाठी शालेय समितीचे अध्यक्ष डॉ.अतुल देशपांडे, प्रभारी मुख्याध्यापक विवेक जोशी, पर्यवेक्षक प्रशांत पिंपळे, वर्गशिक्षक विश्वास पत्की, विज्ञान विषय शिक्षीका महानंदा मुंडे, प्रेमलता खंडागळे ह्यांनी तिला वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे.

स्वरालीच्या या उत्तुंग यशाबद्दल तिचे व पालकांचे अभिनंदन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलुरकर, संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंतजी वैद्य, संस्थेचे मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा.चंद्रकांत मुळे, खोलेश्वर शैक्षणिक संकुलातील सर्व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष विजयराव वालवडकर, कार्यवाह किरणदादा कोदरकर, माध्यमिक विभागाचे शालेय समितीचे अध्यक्ष डॉ. अतुल देशपांडे, सर्व शालेय समितीचे सदस्य, शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक विवेक जोशी, पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे, पर्यवेक्षक प्रशांत पिंपळे, अभ्यासपुरक मंडळ प्रमुख श्रीकांत देशपांडे, विश्वास पत्की, महानंदा मुंडे, प्रेमलता खंडागळे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.



# सामाजिक मूल्यांची पेरणी "रुजवण"

ज्योतिर्मय साहित्य

आबांचे पुस्तक वाचायला मिळणे म्हणजे मनाला सुगंधित कस्तुरी गंध लाभणे, विचाराना परिस स्पर्श होऊन सोन्यासारखे मौल्यवान विचारांचे विचारधन विचाराणं दिशा देणारे, कार्यास प्रवृत्त करणारे प्रेरक मार्गदर्शन होय.

आबा माझ्याकडून हे पुस्तक परीक्षण लिहिण्यास थोडा उशीर झाला त्याबद्दल क्षमस्व .

आबांचे विचार मनाला समृद्ध करून जातात. प्रामाणिक, कायद्याच्या वाटेने जाणारे, समाजातील वंचित घटकांबद्दल कळवळा असणारे, सद्वर्तनी लोक आहेत .त्यांचा शोध घेऊन ही साखळी वाढवली पाहिजे.

सत्यासाठी ,न्यायासाठी भांडणारे, संघर्ष करणारे आणि न्याय मिळतोवर झगडत राहणारेही तरुण आहेत. त्यांना भांडणाचा गुण त्यांनी सत्यासाठी उभा केला आहे. त्यांचे अभिनंदन न करणे शाबासकी न देणे कृतघ्न पणाचे ठरेल . विवेक जागृत करून वाईटाचा निर्दालन आणि चांगल्याच संवर्धन हे व्हायलाच हवे. किती सार्थ विचार या विचारांची कृतीतून अंमलबजावणी व्हायलाच हवी. तरुण पिढीला संस्कारक्षम मार्गदर्शन करणारी रुजवण आपल्या जागृत समाजाने अंगीकारायला हवीच.

आपले विचार हे ठाम विश्वास बनतात. विश्वासातून शब्द उदयास येतात आणि या शब्दानुसार मनुष्य बनतो. बीड येथून प्रसिद्ध होणारे दैनिक सुराज्य या अंकात सन २००५ ते सन २००६ या कालावधीत झोत या सदरात प्रस्तुत लेख प्रकाशित झाले आहेत.

या पुस्तकात चौदा ललित लेख आहेत. नेत्याला भलेबुरे का म्हणतात लोक या लेखातील मला आवडलेली वाक्य निवडणुकीची सभा म्हणजे उकळ्या पाकळ्यांचे रेलचेल . ज्याच्या त्याच्या क्षमतेनुसार कार्य घडतेच. जसा व्यक्ती तसा समाज तशाच क्रिया आणि प्रतिक्रिया ही घडत असतात. कालचा विरोधक आज सहकारी असतो. तर कालचा सहकारी आज विरोधक असतो. तत्व, नीती, विचार यांचा पार चुराडा झालेला आहे.

ज्यांना महिलाबद्दल काही वाटते त्यांच्यासाठी या लेखात बाई म्हणजे तीबलेली कणिक घरात ठेवावी तर उंदराची भीती आणि बाहेर ठेवावी तर कावळे टोचे मारतात. ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त पंजाबी लेखिका अमृता प्रीतम यांनी लिहिल आहे ते खर आहे. एका वाक्यात स्त्री आयुष्याची स्थिती व्यक्त झालेली आहे. एक लाकूड शंभराव्या घा वाला तुटते म्हणजे फक्त शंभरावा घाव महत्वाचा असतो असे नाही .

परिणाम शंभराव्या घावा ला दिसला इतकचं. त्याचा प्रत्येक घाव तेच काम करत होता. अतिशय आधुनिक आणि समाज परिवर्तन घडवून आणणारी विचार सरणी या लेखात वैचारिक लेखणीतून अवतरली आहे. महिला अनेक गोष्टीत बदल घडवून आणू शकतात.

जयंती पुण्यतिथी साजरी केल्याने काय होते ? सद्विचारांची, सदाचाराची, सामाजिक जाणिवांचा बीजे याच वयात पेरली तर येणाऱ्या पिकांची खात्री देता येते. कोणत्याही वंदनीय व्यक्तीचा क्रम लावता येणार नाही. सर्वच आपापल्या परीने समाजासाठी संघर्ष रत आणि निर्मितीक्षम राहिलेले असतात.




पुस्तक परीक्षण

सौ. जयश्री अर्जुन मुंडे
अंबाजोगाई

नवे घडतच असते बदल हे काळाचे लक्षण आहे. बदल होतच असतात. जुने हळूहळू नष्ट होते त्याची जागा नवे घेते. ज्यांच्या आठवणी भूतकाळाची संबंधित असतात.ते स्वतः दुःखी होतातच पण सहवासात असले त्यालाही छळीत असतात. काही घरात समंजस वातावरण असते ती घरे आनंदी असतात एकमेकांना समजून घेतात. बदल स्वीकारतात. ज्यांना हे जमत नाही ते स्वतः दुःखी राहतात आणि दुसऱ्याला ही दुःखी करतात. नव्याचे स्वागत करा.

चळवळी थंडावल्या आहेत का? चळवळीतील अग्रणी व्यक्ती सामाजिक जाण असणारी, प्रयत्नशील ,कल्पक आणि कार्यात सातत्य ठेवणारी असेल तर चांगल्या नेतृत्वाची गरज भागते. चळवळी कधी विस्तारल्या जातात कधी आकुंचन पावतात. तत्वांची रुजवण करणारी नीती हवी.अन्न पाण्याइतकेच सामाजिक जगणेही आवश्यक आहे. असे ज्या व्यक्तीला वाटते ती व्यक्तीच चळवळीची प्रवर्तक असते. असा चळवळीतून येणारा कार्य करता हा समाजशील आणि इतरांच्या मताला मान देणारा चळवळीला पुढे नेणारा असतो. सार्वजनिक कार्यक्रमातून वैचारिक अधिष्ठान लाभते.

सामाजिक उपक्रम वाढले पाहिजेत व्यक्तीच्या सातत्यपूर्ण वागण्यामुळे सवय होते.




तीच त्या व्यक्तीची उपक्रमशीलता असते. माणसाने नीतिमान असावे. जशी व्यक्ती तसाच समाज राहील. व्यक्तीला सामाजिक दायित्व कळावे, व्यक्तिगत आचरण नीतिपूर्ण असावे असे ज्याला वाटते त्या समाजातील उपक्रमशील व्यक्ती कार्यरत असतात. म्हणूनच परिवर्तन घडत राहते.लोकशाहीची उदात्त मूल्ये रुजविण्यासाठी सामूहिक उपक्रमांची आवश्यकता आहे.

समतेचा पुरस्कारता कोण असतो कसा असतो आपल्यापेक्षा कमी असणारा बरोबर घेऊन सम भावाने आचरण करा. समता मूल्य पटलेल्या व्यक्ती आतूनच बदलतात. तो त्यांचा स्थायीभाव होतो. अशा व्यक्ती घटना, तत्वांना, मत मतांतराला निरीक्षण परीक्षणातून पारखून घेतात.समतावादी माताचे बाबतीत आग्रही असतो पण दुराग्रही नसतो. तो बघणारा नसतो. सहभागी असतो.त्याचे नाते समाजाशी आणि त्यातील नाहीरे गटाशी असते.भक्तीचे अंतिम साध्य ईश्वर असतो तसे समता मानणारचे अंतिम साध्य असते मानवी कल्याण.

सरकारी व बाबू लोक जनतेचा कारभार चालवणारी यंत्रणा ही विचाराने आणि कृतीने ठाम असायला हवी. सरकार ही भावनाच दूषित होते. सरकारी नोकरीतील व्यक्ती म्हणजे कुराणात चरायला सोडलेले सांड. सरकारी क्षेत्रात नीतिमूल्ये पाळणारी, माणुसकी जपणारी माणसे आहेत. कायद्याचा आणि लोकमताचाही वचक हवा. तर वरकमाईचा विचार कुणी करणार नाही. तरच सरकारी म्हणजे लोकांची, लोकहिताची, लोकांसाठी ही पवित्र भावना टिकेल.

पुतळा स्मारक यांचे व्यवस्थापन झाले पाहिजे. श्रद्धा ही व्यक्तिगत बाब आहे. ती लादण्याची बाब नसते. श्रद्धा आप आपल्या पूर्ती जपली तर सगळ्यांचेच जगणे सुंदर होईल. पुतळे सुरक्षित राहतील आणि आपणही.

अंधश्रद्धा निर्मूलनासाठी माणूस नीतिमान असावा.विचार भावनेची कवच कुंडले धारण करतो तेव्हा ती होते श्रद्धा.

लोक काय म्हणतील? हा विचार करून कोणी थांबले तर अनेक विधायक हितकारक समाज सुधारक गोष्टी यांना कायमच मुकाव लागेल. कोणत्याही प्रश्नाची राष्ट्रीय उत्तरे शोधताना त्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी व्यक्तिगत प्रतिसाद देता येतो हे लक्षात घेतले पाहिजे. समूहात मूल्य रुजवायची असतील तर हे करणे गरजेचे आहे.

प्रकाश पेरा आपुल्या भवती
दिवा दिव्याने पेटतसे
इथे भ्रष्टता तिथे कष्टता
शंखच पोकळ फुंकू नका.

समाज नासवणारी माणसे येतात तरी कुठून ? या ललित लेख संग्रहात माणूस वागतो त्या मागे अनुवंशिकता, , पर्यावरण आणि शिक्षण या गोष्टी कारणीभूत असतात. तत्व मूल्ये नीती यांना पायदळी तुडवणारे असतात तसेच जिवापाड जपणारे देखील असतात. केवळ ओरड करण्यापेक्षा सदमूल्ये प्रस्थापित कशी होतील तशी आपली कृती असली पाहिजे. ते आपले काम नाही म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही.

चांगले ते कोणालाही कळते त्याची सुरुवात झाली पाहिजे. तळतळून बोलणारे खरेच असतात. त्यांच्यावर परंपरा, संस्कृती, रितीरिवाज यांचा पगडा असतो. तो त्यांचा संस्कार असतो. त्यामुळे ते नाविन्य स्वीकारण्यास तयार नसतात. आजही महिला तिच्या माणूसपणाच्या शोधात आहे. नव्याने सुरू झालेल्या गोष्टी झुळझुळ नाऱ्या असतात. बीडच्या एका जयंती समितीने अठरा तास वाचन अभ्यास करून वेगळ्या पद्धतीने जयंती साजरा केली.

आम्ही काय समजतो स्वतःला आमचे आदर्श कोण? आज जो तो आकसतो संकुचित होतो आहे. बहुआयामी विचार सरणी असावी.

समाज परिवर्तन घडवून आणणारी रुजवण कोटी कोटी सलाम आबा आपल्या लेखणीला.

पुस्तकाचे नाव. रुजवण
लेखकाचे नाव . आबासाहेब वाघमारे
पृष्ठसंख्या.५६ किंमत. ९९
प्रकाशक. हर्षवर्धन पब्लिकेशन

***

# कशिद्याच्या रुपकांतून योगमार्गाचे तत्वज्ञान सांगणारी कवयित्री- संगीता वाणी

ज्योतिर्मय साहित्य

जगाच्या पाठीवर या मराठी चित्रपटात एक धागा सुखाचा .... हे गाजलेले गीत आहे.मानवी जीवनालाच गदिमांनी जरतारी आयुष्याची उपमा दिलीय.त्यातील शेवटचे कडवे खूप महत्वाचे आहे,

''या वस्रांते विणतो कोण?
एक सारखी नसती दोन!
कुणा न दिसले त्रिखंडात त्या,
हात विणकराचे....''

मानवी देहालाच वस्राची उपमा दिली आहे.तो असा विणकर आहे की, त्याने रंगी बेरंगी अनेक वस्र विणलीत. मात्र कोणतेच एक सारखे नाही. घटा घटाचे रुप आगळे ! आपल्याला पहायला मिळते.या सृष्टीत जी नवनिर्मिती आहे, जो सृजनोत्सव चालतो, त्याचा कर्ता कोण? म्हणून तर तुकोबा आश्चर्ययुक्त होऊन प्रश्न करतात, भर वैशाख वणव्यात या वृक्षांना नवी पालवी फुटते ! त्यांच्या मुळाशी उदक कोण घालतेय?'' ज्ञानदेव तर त्याच्याशी भांडतातच,

''कान्होबा तुझी घोंगडी चांगली।
आम्हासी का दिली वांगुली रे।।''

नऊ ठिकाणी फाटकी, वेडी वाकडी घोंगडी आम्हाला दिली अन् तुझी मात्र बघ बरं, किती चांगली आहे!अनेक संतांनी घोंगडी हे रुपक लिहीलेय.घोंगडी विणण्याची व त्यावर नक्षीकाम करण्याची प्राचीन कलाकुसर आहे. म्हणून तर पांडुरंगाच्या खांद्यावर, शेला किंवा घोंगडी असते,ती प्रतिक असते मानवी देहाचे. तो मोठा विणकर आहे. हिंदी साहित्यात संत कबीरजींचे चदरीया झिनी रे झिनी। हे प्रसिध्द कवन आहे.देहालाच चादर संबोधले आहे.

''अष्ट कमल का चरखा बनाया, पाँच तत्व की पूनी।
नौ दस मास बुनन को लागे, मूरख मैली कीनी। १।''

या ठिकाणी कबीर चरख्याला आठ आर्या असल्याचे वर्णन करतात.काही अभ्यासक या आठ आर्या म्हणजे कर्मेंद्रिय असल्याचे नोंदवितात. तर काही अभ्यासकांच्या मते या आठ पाकळ्या म्हणजे अष्ट लक्ष्मी आहे.लक्ष्मी म्हणजे मायेची आठ रुपे. ब्रम्ह आणि मायेमुळे ही सृष्टी निर्माण झाली.स्त्री हे सृजनाचे प्रतिक आहे. उजैनला जे कालभैरवनाथ मंदिर आहे, तिथे या अष्टकमलाची मूर्ती आहे. आठ पाकळ्या असलेल्या कमळाच्या आकाराचे दगडी शिल्प आहे. मधोमध एक लिंग रुपातील शिल्प आहे. सृष्टीच्या निर्मिती प्रक्रियेचे हे प्रतिक दर्शविले आहे. वेदांत तत्वज्ञानानुसार चार देह (स्थूल, कारण, सूक्ष्म, महाकारण) व अंतःकरण चातुष्ट्य (मन, बुध्दी, चित्त अहंकार) याला अष्टकमल मानले जाते. या आठ पाकळ्या म्हणजे, कबीरांचे अष्टकमल . पाच तत्व म्हणजे पृथ्वी, आकाश, तेज, वायू, जल ही पंचमहाभूतं. यांच्या सहाय्याने ही चादर विणली असे कबीर म्हणतात. ही चादर विणण्यासाठी नऊ महिने लागले,म्हणजे गर्भात हा जीव नऊ महिने राहिला.हे वस्र विणून झाल्यानंतर मी ते रंगकामासाठी रंगार्याकडे पाठविले, असे



वर्णन करताना कबीर म्हणतात की,

''जब मोरे चादर बन घर आई, रंगरेज को दीनी।
ऐसा रंग रंगा रंगरेज ने, लालों लाल कर दीनी।। २।।''

देह निर्माण झाल्यानंतर खरी गरज असते, ती संस्काराची.गुरु त्यावर रंगकाम करतात.मग गुरुस्थानी सद्गुरुच असतात,पण

प्रा.डॉ.दत्तात्रय प्र.डुंबरे
प्रमुख,
मराठी विभाग व भाषा संशोधन केंद्र,
विवेकानंद महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर.

आई, वडील, पत्नी, समाज हे सगळेच गुरु असतात.त्या जीवावर संस्कार करणे म्हणजे, रंग लावणे होय.म्हणून तर संत सोयराबाई म्हणतात,

''अवघा रंग एक झाला। रंगी रंगला श्रीरंग।।'' सार्या रंगात श्रीरंग हा श्रेष्ठ आहे. म्हणून तर संत ''शुध्द रंगवावे रंगा।'' असा परिहार देतात. संत जनाबाई तर ''माझा रंग तुझे गुणी।'' असे छातीठोकपणे सांगते. संत मीराबाईचे एक सुंदर भजन आहे, त्या म्हणतात की,'' हे कान्हा माझी चुनरी रंगवून दे !'' त्यांच्या रंग दे चुनरिया या भजनातील पुढील ओळी खूप महत्वाच्या आहेत,

''ऐसी रंग दे के रंग नही छूटे।
धोबीया धोये चाहे सारी उमरीया!''

धोब्याने म्हणजे या संसारात जी प्रतिकुलता येईल, त्या प्रतिकुलतेचा काहीच परिणाम होऊ देऊ नकोस. माझी निष्ठा तुझ्या चरणी अशी राहू दे, की आयुष्यभर तुझा रंग सोडून अन्य कोणताच रंग हे रंगनाथा मला लागू देऊ नकोस!

खान्देशातील कवयित्री संगीता वाणी यांची कशिदा भावनेचा ही कविता याच आशयाची आहे. वरवर ही कविता आपल्याला प्रेम कविता वाटते.एक नायिका आपल्या प्रियकराला सप्तरंगाचा कशिदा अर्पण करते असा भाव दिसून येतो. नायिका नायकासाठी एक एक रंग भरुन कशिदा विणतेय, वेलबुट्टी काढतेय अशी मध्यवर्ती कल्पना आहे. एक रंग भरुन तो कशिदा रेशिमधाग्यांनी ती विणतेय.

''तुझ्या सार्याच भावनांना
माझ्या भावनेच्या धाग्यांनी
विणून टाकते कशिद्यात,
उलट सुलट टाक्यांनी!''

इथे कवयित्री मनोविश्लेषणवादी भूमिकेतून व्यक्त होते.दोन जीवांच्या भाव भावनांची सुंदर गुंफण म्हणजे,प्रेम तो प्रेमभाव कवयित्री व्यक्त करते.दोन स्वतंत्र देह असले तरी मनाने, भावनेने, हृदयाने इतके एकजीव झाले आहेत की,

''राधेला पाहुन भूलले हरी।'' अशी अवस्था होते.ज्ञानदेवांच्या शब्दात सांगायचे म्हणजे, ''दर्पणी पाहता रुप न दिसे आपुले। बाप रखुमादेवीवरु मज ऐसे केले।।''

ती असते मीरा, ती असते कृष्णवेडी राधा,ती असते रुक्मिणी,ती असते सत्यभामा..... अगदी कृष्णप्रिया !

या कवयित्रीने कशिद्याचे रुपक योजले आहे,तो कशिदा काही सामान्य नाही. ज्या वस्रावर ती विणतेय ते वस्र म्हणजे मानवमात्र आहे. कोणतेही संस्कार नसलेला जीव. त्या कोर्या वस्रावर ती कशिदा विणते,त्यावेळी ती कुणी सामान्य स्री नसते, तर ब्रम्हा, विष्णू, महेश या तीन बालकांना जोजवणारी माता अनुसया असते.स्रीकडे मूलतः सृजनशक्ती असते.या सृजनाचा आविष्कार ती घडवू पाहतेय.

''तुझ्या पवित्र भावनांना
शुभ्र धवल वस्रात विणते
तर मस्तीभरल्या भावांसाठी
खास रंग निवडून ठेवते !''

या कडव्यात वरवर पतिपत्नीतील हृद्य नातं दिसेल.त्याच्या पवित्र भावनांसाठी सफेद रंग विणकामासाठी निवडते,तर त्याच्यातील अल्लडपणासाठी खास रंगांची योजना करतेय,असा वाच्यार्थाने अर्थ करता येतो.मात्र या कवयित्रीचे वैशिष्ट्य हे की,एकाचवेळी अनेक पातळीवरुन त्या व्यक्त होतात.म्हणून या कडव्याचा अर्थान्वय व्यंजनेने करावा लागतो.

मानवी देहाला कशिदा म्हणतात, तेव्हा या मानवी शरीरात जी सप्तचक्रे कल्पिली आहेत, त्यांचाही विचार करावा लागतो. आणि हे प्रत्येक चक्र एका रंगाशी जोडलेले आहे.कुंडलिनी जेव्हा जागृत होते, तेव्हा तिचा प्रवास मूलाधाराकडून सहस्राधाराकडे होत असतो. प्रत्येक चक्राचे भेदन करीत ती वर जाते.हा पांढरा रंग सहस्त्रार चक्राशी निगडीत आहे. पांढरा रंग

जुद्धता, निरागसता आणि प्रकाजमानतेचा रंग
आहे हे रंग तुम्हाला तुमच्या अंतरात्माला त्याच्या
स्रोताजी जोडण्यास आणि उच्च आध्यात्मिक
क्षेत्रांकडून पाठिंबा मिळविण्यास मदत करतात.कवयित्रीने कुंडलिनी जागृतीनंतर ती ज्या सर्वोच्च स्थानी गेली, त्याचे वर्णन या कडव्यात केले आहे.

या चक्रांमध्ये दुसरे जे महत्वाचे चक्र आहे,ते आहे विशुध्द चक्र. या चक्राचे स्थान कंठात असते.त्याचे वर्णन करताना कवयित्री म्हणते की, निळ्या -काळ्या रंगाचा धागा मी तुझ्या धीर गंभीर भावासाठी निवडला आहे. क्रमशः

## बालाजी नगरचे रहिवासी श्री रावसाहेब कुंजीर आणि अयोध्येतील रामलल्ला : खऱ्या भक्तीची अनुभुती

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे / प्रकाश गोरे-** नुकतीच रामनवमी झाली रावसाहेब कुंजीर, सौ मिना कुंजीर, कन्या सौ अनिता सोनवणे हे सर्वजण नुकतेच अयोध्या येथे राम लल्ला दर्शनासाठी जावून आलेत. प्रभु रामचंद्रांचे दर्शन घ्यावे हा विचार मनात होता पण खाली हाताने जाणे या कुटुंबाला मान्य नव्हते मग या राम लल्लाला एक किलोचा चांदीचा हार घेवून जाण्याचा विचार मनात आला आणि पुण्यातून छानसा चांदीचा एक किलो वजनाचा हार घेतला आणि प्रवास सुरु झाला अयोध्येचा अयोध्येमधील दर्शनाची गर्दि , तेथील नियम म्हणून हा हार प्रभु रामचंद्रांपर्यंत पोहचणार कसा या चिंतेने रात्रभर झोप नाही पण बालाजीनगर येथे गेली सुमारे ३० वर्षा पेक्षा ज्यास्त श्री दुर्गा भवानी मातेची सेवा करणारे हे कुंजीर कुटुंब त्यांना या सेवेचे फळ म्हणून सकाळी प्रभु रामलल्लाच्या दरबारात बोलावणं आलं आणि साक्षात या रामरायाच्या गाभाऱ्यात त्यांनी आणलेला हा हार मंदिर देवस्थानने स्वीकारून कुंजीर कुटुंबीयांना शाल व प्रसाद देवून सन्मानित करण्यात आले काहीही मनीध्यानी नव्हते ओढ होती ती फक्त प्रभु रामचंद्राच्या दर्शनाची, हे दर्शन झाले आणि परतीचा पुण्याचा प्रवास झाला खूप वर्ष आई श्री दुर्गा भवानी मातेची सेवा केली आणि अयोध्येला प्रभु रामचंद्रांच्या गाभाऱ्यात झालेल्या सन्मानाने मिळालेले समाधान हे त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होते.

दि ३१ मार्च रामनवमी होती अचानक अयोध्येहून फोटो आले आणि ते पाहता आपण स्वप्नात आहो का असे जाणवले कारण तो चांदीचा हार हा रामनवमीला रामचंद्रांच्या उत्सव





मुर्तीला घातला होता बालाजी नगरच्या या कुंजीर कुटुंबाला ईश्वरी सेवेचा आशिर्वाद मिळाला रामनवमीला करोडो हिंदु बांधवांच्या आस्थेचे प्रभु राम यांच्या गळ्यात आपण दिलेला चांदीचा हार घातलेला पाहून या कुटुंबाच्या आनंदाला सीमा उरली नाही धनकवडी परिसरातील बालाजीनगर येथे रहाणारे कुंजीर कुटुंबियांचा मान, सेवा हे आम्हाला पण अभिमानास्पद आहे रावसाहेब कुंजीर हे अनेक वर्ष मार्केट यार्ड मधील फळांचे मोठे व्यापारी आहेत आंब्याच्या सिझन मधील पहिली आंब्याची पेटी यांच्या गाळ्यावर विक्रीसाठी येते आणि या सिझन मधील पहिली एक पेटी या वर्षी ३५ हजार रु किंमतीला विकली गेली असे हे फळांचे व्यापारी त्यांच्या श्रध्देचा मान खरोखरच गौरवास्पद आहे

## शारदानगर मध्ये राज्यस्तरीय कृषी उद्योजक कौशल्य विकास कार्यशाळेचे आयोजन

ज्योतिर्मय साहित्य

शारदानगर, बारामती: महाराष्ट्र उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र-करिअर कट्टा तसेच शारदाबाई पवार महिला आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज यांच्या वतीने ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट बारामती शैक्षणिक संकुलामध्ये कृषी उद्योजक कौशल्य विकास कार्यक्रम या एक महिना कालावधीच्या मोफत कार्यशाळेचे आयोजन दिनांक १२ मार्च २०२५ पासून करण्यात आले आहे. या कार्यशाळेच्या पहिल्या तुकडीमध्ये एकूण १०० विद्यार्थी विद्यार्थिनी सहभागी होणार आहेत. सदर विद्यार्थी महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील असणार आहेत. आजच्या स्पर्धेच्या जगामध्ये सरकारी नोकऱ्यांचे प्रमाण नगण्य झाले आहे. तसेच खाजगी क्षेत्रामध्ये ही तरुण वर्गाला संघर्ष करावा लागत आहे, अशा परिस्थितीत स्वतःचा उद्योग व्यवसाय उभा करणे, विशेषतः शेती विकासामधूनच कृषी उद्योजक म्हणून कौशल्य प्राप्त करणे, सहज शक्य आहे. बारामती येथील ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे कृषी विज्ञान केंद्र आणि शैक्षणिक संकुलातील शारदाबाई पवार महिला आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, डॉ शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चरल अँड अलाईड सायन्सेस, तसेच येथील अटल



इनक्युबेशन सेंटर, सेंटर ऑफ एक्सलन्स-डेअरी, हॉर्टिकल्चरल आणि फूड प्रोसेसिंग ही सेवाकेंद्रे महाराष्ट्रातील शेतकरी आणि विद्यार्थ्यांकरीता कृषीजन्य उद्योगांचे प्रशिक्षण घेण्याकरिता अत्यंत मौलिक आहेत. करिअर कट्टा च्या माध्यमातून यापुढे महाराष्ट्रातील आणखी १४०० विद्यार्थ्यांना अशा प्रकारचे प्रशिक्षण द्यायची भूमिका महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्राचे अध्यक्ष माननीय श्री यशवंत शितोळे यांनी मांडली.

शेतीकडे पारंपारिक नजरेतून न बघता स्वतःला परंपरागत शेतकरी न समजता, विद्यार्थ्यांनी स्वतःला कृषी उद्योजक म्हणून पहायला पाहिजे. त्या दृष्टिकोनातून शेती बरोबरच शेतीजन्य जोडधंदे करून विद्यार्थ्यांनी व इतर सर्वांनी भावी काळामध्ये स्वतःचा विकास करून घेतला पाहिजे. विद्यार्थ्यांनी शिक्षण कोणतेही घ्यावे परंतु शिक्षणाबरोबरच आयुष्यामध्ये प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष करताना स्वतःला आयुष्यात उभे करेल असे एखादे कौशल्य शिकले पाहिजे, असे ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट या संस्थेचे चेअरमन श्री. राजेंद्र पवार यांनी सांगितले.

या एक महिना कालावधीच्या कार्यशाळेमध्ये कृषी उद्योजक कौशल्या बरोबरच ड्रोन दुरुस्ती, मेंटेनन्स आणि चालवण्याचे कौशल्य, भरडधान्य प्रक्रिया उद्योग कौशल्य आणि शेतीजन्य ई-कॉमर्स यावर प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्याचबरोबर ड्रोन लायसन्स आणि भरडधान्य प्रक्रिया उद्योग उभारणीचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळणार आहे. अशा प्रकारच्या सुसंधीचा लाभ विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणारे ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट हे एकमेव ठिकाण आहे. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. निलेश नलवडे यांनीही अशा प्रकारचे कृषी उद्योजकता कार्यक्रम निश्चितपणे विद्यार्थ्यांना भावी काळात आत्मनिर्भर बनवेल असे सांगितले. सदर कार्यशाळेचे समन्वयन शारदाबाई पवार आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज करत असून कृषी विज्ञान केंद्राचे विषयतज्ञ, अटल इनक्युबेशन सेंटर आणि कृषी महाविद्यालयाचे तज्ञ प्राध्यापक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. अशी माहिती समन्वयन करणाऱ्या महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. श्रीकुमार महामुनी यांनी दिली. कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. धीरज शिंदे, विषयतज्ञ डॉ. मिलिंद जोशी, श्री. यशवंत जगदाळे, डॉ. विवेक भोईटे, श्री. संतोष करंजे, श्री. संतोष गोडसे, अटल इनक्युबेशन सेंटरच्या प्रमुख प्रा. जया तिवारी, प्रा. सोनाली सस्ते या सर्वांचे तसेच देशातील विविध भागातून आलेले तज्ञ मार्गदर्शक यांचे मार्गदर्शन सहभागींना मिळणार आहे. या कार्यशाळेचे समन्वयन डॉ. आर. एस. सुरवसे, डॉ. एम. आर. निंबाळकर, आणि करिअर कट्ट्याच्या श्रीमती किरण पाटील करीत आहेत.

# एका विवाहाची गोष्ट...

ज्योतिर्मय साहित्य

मी १९८४-८८ कालवधीत माझ्या मायभूमी राणी सावरगांव ता.गंगाखेड जि.परभणी येथे कार्यरत होतो.त्या काळात ते पशुवैद्यकीय केंद्र वर्ग तिन मधून वर्ग दोन मध्ये रुपांतरीत झाल्या मुळे मी बीड जिल्ह्यातून शासनाच्या स्थलांतर आदेशान्वये तेथे रुजू झालो.. अर्थात त्या काळात माझ्या मातोश्री सारख्या आजारीच असत. त्यामुळे ११ वर्ष कुटुंबासह राहू शकलो नाही.

त्या काळात माझे गांव एक दूर्गम होते. गांवात फक्त तिनच टू व्हिलर होत्या.बर्याच आपात्कालीन स्थितीत माझ्या टू व्हिलर जनसेवेच्या उपयोगी पडायची. फक्त ''बहू जन हिताय बहू जन सूखाय'' हे ब्रीद वाक्य लिहिणे बाकी होते..! ५/४/१९८६ ची घटना आहे. आमच्या गल्लीतील किराणा दुकानदार तरुण पंडित रामराव कोटलवार याचे लग्न गंगाखेड येथिल श्री. सखाराम सावकार पेकम यांची कन्या चि.सौ.छाया हिच्याशी नियोजित झालेले होते. व विवाहाचा शुभमुहूर्त शुक्रवार दि.४/४/१९८६ होता. त्याप्रमाणे विवाह पत्रिकेचे वाटप ही झाले होते. दोन्ही उभय पक्षी घर पाहुण्यांनी भरले होते. वधू पक्षा कडील देवकार्य ही पार पडले होते. पण मानसिक तणावा मुळे पंडित सावकार एक आठवडा घर सोडून कोणाला ही न सांगता बाहेर गांवी गेला होता.व त्याचा कांहीच संपर्क होत नव्हता. त्यामुळे गांवात चर्चेचाविषय झाला होता. त्यात पंडित चे वृध्द वडिल स्व.श्री.रामराव काका चिंतीत होते.... त्यांच्या डोळ्यातील अश्रू ही थांबत नव्हते. पण दि.५ एप्रिल रोजी सायंकाळी अचानक पंडित घरी परतला होता. नंतर त्याला विचारणा करुन दुसर्या दिवसी लग्नास तयार केले. नंतर वधू पक्षाच्या मानसिक तयार करण्या ची जबाबदारी माझ्या वर व स्व.श्री. व्यंकट आण्णा रेवणवार यांच्या वर सोपवली होती.




गंगाखेडला रात्री जाणे व त्यांची संम्मती घेऊन निरोप

वर पक्षाला कळवणे फारच तातडीचे काम होते. त्या काळात सायंकाळी सहाची बस गेल्यावर दुसरी बस व परत निरोप घेऊन येण्या साठी ही बस नव्हती.... संपर्काचे कोणतेच साधन नव्हते.आशा स्थितीत मी व व्यंकट आण्णा रात्री ९-३० वाजता गंगाखेड ला निघालोत गंगाखेडला नगरेश्वर गल्लीतील सखाराम पेकम यांच्या चिरेबंदी वाड्यावर रात्री १०-४५ वाजता पोंहचलोत.

बंद दरवाजा वर बर्यात हक्का मारल्या नंतर वधू पित्याशी संपर्क झाला. नंतर त्यांच्या बरोबर यथोचित चर्चा करुन व सकाळी विवाहाच्या तयारी साठी मानसिक तयार करुन रात्री सुमारे १२-३० च्या दरम्यान परत सावरगांवी निघालोत. परत निघत असतांनां रोडवर टू व्हिलर पम्चर झाली. त्यामुळे संपर्काचे कोणते ही साधन नव्हते.

रात्री एक वाजे पर्यंत काय करावे? या स्थितीत रोडवर च विचारमग्न अवस्थेत थांबलो होतो. शेवटी आमच्या गंगाखेडच्या प.वै.दवाखान्याचा प्रामाणिक सेवक कालू ढकलगाडा, बत्ती व त्यावर गोष घेऊन जात होता. कारण त्याच्या छोट्या भावाची शादी होती. पण त्या परिस्थित त्यांने मला ओळखले व

इतने रात कंहा जा रहे डाक्टर साब?

विचारले. मग सर्व गोष्टीचा खुलासा केला व त्यांने तो गाडा घरी ठेऊन मदतीसाठी धावतच आला. व गांडीचे पम्चर काढून दिले. त्याला चहा पाजायला कोणते ही हॉटेल उपलब्ध नव्हते. त्याचे आभार मानून आम्ही पहाटे ४-३० वाजता गांवी परतलो.तेंव्हा गाडीच्या आवाजा कडे

लक्ष देणारी व विवाहा साठी दक्ष वर पक्षा कडील मंडळी

बरोबर जागीच होती त्यांच्या बरोबर चर्चा केली व या प्रकारे रविवार (६/४/१९८६) विवाह श्री.रेणुका मातेच्या मंदीरात देव, अग्नी व उपस्थितांच्या साक्षीने संपन्न झाला व आशा प्रकारे पंडित कोटलवार चतूर्भूज झाला...

नंतर त्याच्या वंश वेली वर दोन सूपुत्र व दोन सुकन्या

झाल्या. जेष्ठ मुलगा डॉक्टर व दुसरा मुलगा व दोन्ही मुली डी.फार्मा. झाल्या व जावायी आयुर्वेदिक कॉलेजला प्राध्यापक आहेत. एक यशस्वी धान्य व्यापारी म्हणून पंडित सावकार आर्य वैश्य समाजात यशाच्या उच्च शिखरावर आहे !

## ''प्रभावी अभिवाचन कसे करावे?'' या विषयावर वेबिनार

ज्योतिर्मय साहित्य

पुणे - अभिज्ञान, पुणे द्वारे ''प्रभावी अभिवाचन कसे करावे?'' या विषयावर वेबिनार आयोजित करण्यात आला आहे. २० एप्रिल २०२५ रोजी संध्याकाळी ७ ते ९ या वेळेत हा ऑनलाईन वेबिनार आयोजित केला जाणार आहे.

हा वेबिनार पालक, शिक्षक, विद्यार्थी आणि विविध स्पर्धांमध्ये भाग घेणाऱ्या स्पर्धकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

सौ. मानसी सोनपेठकर, या वेबिनारमध्ये मार्गदर्शन करतील. त्यांनी अनेक अभिवाचन स्पर्धांमध्ये वैयक्तिक व सांघिक पारितोषिके मिळवली आहेत. त्या अध्यापन क्षेत्रातील समर्पित आणि प्रेरणादायी प्रशिक्षक म्हणून ओळखल्या जातात.

**वेबिनारमध्ये समाविष्ट विषय:**

**अभिवाचन म्हणजे काय?**

वाचन आणि अभिवाचन यामधील फरक

प्रभावी आवाज, लय, विराम आणि स्पष्टतेचे महत्त्व

स्पर्धांमध्ये यश मिळवण्यासाठी उपयुक्त टिप्स

प्रत्यक्ष उदाहरणे व प्रात्यक्षिक सादरीकरण

सहभागींना पीडीएफ नोट्स आणि पीडीएफ प्रमाणपत्र दिले जाणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपासाठी डॉ. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर, भारतीय ज्ञान प्रणाली तज्ज्ञ, उपस्थित राहणार आहेत.

नोंदणी शुल्क केवळ रू.५० असून, इच्छुकांनी ७२४९१२२४२८ या क्रमांकावर / द्वारे शुल्क पाठवून नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी संपर्क: ७२४९१२२४२८ / ९८५००७४४१८

मर्यादित जागा असल्यामुळे इच्छुकांनी लवकरात लवकर नाव नोंदवावे, असे आयोजकांनी कळविले आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559